MHAM030001672024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | :: | ०८/०१/२०२४ |
| नोंदणी दिनांक | :: | ०८/०१/२०२४ |
| निकाल दिनांक | :: | ०३/०५/२०२४ |
| कालावधी | :: | ०० व, ०३ म, २६ दि |

<table>
<tr><td colspan="2">अमरावती येथील मुख्य न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,(न्यायालय क्रमांक १२), अमरावती.<br>(पीठासीन अधिकारी : रोहिणी सं. पाटील)</td></tr>
<tr><td colspan="2">नियमित फौजदारी खटला क्रमांक ५५/२०२४ निशाणी २०</td></tr>
<tr><td colspan="2">प्रथम खबर/गुन्हा आणि पोलिस ठाणे<br>गुन्हा क्रमांक ६८९/२०२२, दिनांक १६/०८/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ३५४ (ड) व ५०६ अन्वये. राजापेठ, पोलिस स्टेशन, अमरावती.</td></tr>
<tr><td>अभियोगपक्ष.</td><td>महाराष्ट्र सरकार,<br>व्दारा पोलिस ठाणे अमंलदार,<br>राजापेठ पोलीस स्टेशन,<br>ता. व जि. अमरावती.</td></tr>
<tr><td>अभियोगपक्षातर्फे अभियोक्ताः-</td><td>श्रीमती पि. एन. डोंगरे</td></tr>
<tr><td>आरोपी.</td><td>तेजस जगदिशराव सोनकुसरे<br>वय – २३ वर्षे, धंदा- शिक्षण<br>रा. महात्मा फुले शाळेजवळ,<br>संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट,<br>जि.वर्धा.</td></tr>
<tr><td>आरोपीतर्फे विधीज्ञः-</td><td>श्री. एस.बी. डबरासे</td></tr>
</table>

## भाग-ब.

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक. | १५/०८/२०२२. |
| गुन्हा दाखल झाल्याचा दिनांक. | १५/०८/२०२२. |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक. | ०८/०१/२०२४. |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक. | १०/०४/२०२४. |
| प्रकरण पुराव्याला निश्चीत केल्याचा दिनांक. | १०/०४/२०२४. |
| प्रकरण न्यायनिर्णया करिता निश्चीत केल्याचा दिनांक. | ०३/०५/२०२४. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक. | ०३/०५/२०२४. |
| आदेश दिल्याची दिनांक, इतर काही. | ०३/०५/२०२४. |

## आरोपी बाबतचा तपशील.

| आरोपी क्रमांक. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख. | जामीनावर सोडल्याची तारीख. | दाखल गुन्हा. | शिक्षा किंवा दोषमुक्त केले ? | दिलेली शिक्षा. | प्रकरणा दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | तेजस जगदिशराव सोनकुसरे | १६/८/२२ | १६/८/२२ | भा.द. वि. कलम ३५४ (ड) व ५०६ | दोषमुक्त | नाही. | नाही. |

## न्यायनिर्णय
( आज दिनांकः-०३ मे,२०२४ रोजी उद्घोषित )

**१)** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३५४(ड) व ५०६ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

**२)** अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, सदरील घटना ही दि.१५.०८.२०२२ रोजी २१.०० वाजताच्या दरम्यान गोंडबाबा मंदीर, राजापेठ, अमरावती येथे घडली. फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना ओळखत असून एकाच कॉलेजमध्ये इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होते. आरोपीने फिर्यादीसोबत मैत्री करुन तिचे सोबत बोलणे सुरु असतांना तिचेवर प्रेम करतो व तिचे सोबत लग्न करायचे आहे असे सांगून फिर्यादीला त्रास देणे सुरु केले, तिचा पाठलाग करत तिचे हॉस्टेल पर्यंत जात असे. दि.१५.०८.२०२२ रोजी २१.०० वाजताच्या दरम्यान गोंडबाबा मंदीर, राजापेठ, अमरावती येथे आरोपीने फिर्यादीला कॉल करुन त्याने हाताची नस कापली आहे, तु पुढे बघ काय होते असे बोलून फिर्यादीला धमकावले. सबब, फिर्यादीने राजापेठ पोलीस स्टेशनला आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादीवरुन पोलिस स्टेशन राजापेठ येथे गुन्हा क्र.६८९/२२ हा गुन्हा दाखल झाला.

**३)** सदर गुन्ह्याचा तपास पो. उप.निरीक्षक आर. एन. गवई यांच्याकडे वर्ग करण्यात आला. ए. एस. आय. डी. एच. भांडारकर यांनी घटनास्थळ पंचनामा केला. तपासी अमलदाराने आरोपीस अटक केले व साक्षीदारांचे जबाब नोंदवीले. तपास संपल्यानंतर ठाणे अमलदार राजापेठ यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४) मी निशाणी १२ अन्वये आरोपीविरुध्द दोषारोप ठेवले. सदर दोषारोप आरोपीला त्याचे मातृभाषेत वाचुन व समजावून सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५) अभियोगपक्षातर्फे एका साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात आला आहे. त्याबाबत परिशिष्ठामध्ये नमुद केले आहे. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे जबाब त्याचे विरुद्ध कोणताही पुरावा न आल्याने नोंदविण्यात आलेले नाही.

६) अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे पुढील मुद्दे न्यायनिर्णयासाठी विचारार्थी उद्भवतात. सदर मुद्दयांची उत्तरे मी कारणमिमांसा व विवेचनाव्दारे पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दिनांक दि.१५.०८.२०२२ रोजी २१.०० वाजताच्या दरम्यान गोंडबाबा मंदीर, राजापेठ, अमरावती येथे आरोपीने फिर्यादीसोबत तिच्या इच्छेविरुद्ध व तिने हरकत घेतल्यानंतर देखील तिच्या सोबत संपर्क साधला ? | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देत फौजदारीपात्र धाकदपटशाचा वापर केला ? | नकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## : का र ण मि मां सा :

मुद्दा क्रमांक १ व २ बाबत : -

७) सदरील मुद्दयाचा पुरावा हा एकाच घटनेशी निगडीत असल्याने सदरील मुद्दे एकत्रीत चर्चिले आहेत.

८) सदर खटल्यातील साक्षीदार क्र.१ फिर्यादी-अ हिने तिच्या पुराव्यामध्ये असे सांगितले आहे की, ती आरोपीला ओळखते, कारण तो तिच्या कॉलेजमध्ये शिक्षणास होता.

सदरील घटना ही दोन वर्षापूर्वी ती कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना घडली असे नमूद केले आहे. सदर साक्षीदाराने ती कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना आरोपी हा त्यांचा पाठलाग करीत आहे असा गैरसमज झाला होता. तसेच त्यांना आरोपी वारंवार फोन करतो असा देखील त्यांचा समज असल्याने त्यांनी त्याच्या बाबतीत पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती असे कथन करुन तिने तक्रारीवरील केवळ सही निशानी १६ व १७ मान्य करुन त्यामधील मजकूर माहित नसल्याचे नमूद केले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने त्यास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी देउन देखील अभियोगपक्षास पुरक ठरेल असा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदर साक्षीदाराने उलट तपासादरम्यान तिची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे हे मान्य केलेले आहे.

९) सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे व अभिलेखावर उपलब्ध असलेले कागदपत्राचे अवलोकन केले असता फिर्यादीने आरोपी विरुध्द कोणताही पुरावा दिलेला नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे, असे नि.१४ वरील पुरसीस वरुन दिसते. कथित घटना व घटनेतील आरोपीचा सहभाग याबाबत अभिलेखावर कोणताही सबळ पुरावा आलेला नाही. सबब आरोपीविरुद्ध नोंदवण्यात आलेला दोषारोप हा वाजवी संशयापलीकडे शाबीत होत नाही. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

मुद्दा क्रमांक ३ बाबतः-

१०) अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे प्रकरण वाजवी संशयापलीकडे सिध्द केलेले नाही, म्हणुन या न्यायालयाने मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविले आहे. सबब, आरोपी हा भारतीय दंड विधानचे कलम ३५४(ड) व ५०६ या दंडनिय अपराधातुन निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे जामीनाची पुर्तता करावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | आदेश |
|---|---|
| १. | आरोपी तेजस जगदिशराव सोनकुसरे यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ३५४ (ड) व ५०६ या दंडनिय अपराधामधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे पुर्वीचे जामीन रद्द करण्यात येतात. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ प्रमाणे जामीनाची पुर्तता करावी. |
| ४. | न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात न्यायालयीन वेळेत उद्घोषित करण्यात आला. |

दिनांक: ०३ मे, २०२४.

(रोहिणी सं. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्रं.१२), अमरावती.

## परिशिष्ठ भाग क.

### सरकारी/ आरोपीच्या / न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

| क्रमांक. | नाव | पुराव्याचा प्रकार. |
|---|---|---|
| साक्षीदार क्रं.०१ | अ | फिर्यादी |

### सरकारी/ आरोपीच्या/ न्यायालयाच्या निशाण्यांची यादी.

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| ०१ | १६ व १७ | तक्रारी वरील सही |
| ०२ | १४ | तडजोड पुरसिस |
| ०३ | १८ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४ | १९ | अटक पंचनामा |

### महत्वाचा मुद्देमाल

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| ०१. | नाही | नाही |

दिनांक: ०३ मे, २०२४.

(रोहिणी सं. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्रं.१२), अमरावती.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word for word as per original Judgment/Order.

Name of steno : Ku. V. S. Dongare

Court Name : Smt. R. S. Patil,
12th Jt.Civil Judge,J.D.,Amravati.

Date of Order : 03/05/2024.

Order signed by
Presiding Officer on : 03/05/2024.

Judgment/Order
uploaded on : 06/05/2024.